विशेष लेखापरीक्षणाचे आदेश
देण्यापूर्वी घ्यावयाची दक्षता.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक लेखाप-1093/प्र.क्र.261/93/लेखापरीक्षा,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 19 जून, 1995.

**शासन परिपत्रक** :- मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियम, 1931 च्या नियम 15 अन्वये विशेष लेखा परीक्षण अडचणींचे निवारण करण्यांच्या दृष्टीने काय उपाययोजना करावी. याबाबत सखोल विचारान्ती शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

2. विशेष लेखापरीक्षणाचे आदेश देण्यापूर्वी, संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, महसूल विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व प्रमुख कार्यालयीन अधिकाऱ्यांनी पुढील मार्गदर्शक तत्वाचे काटेकोरपणे पालन होईल याची पुरेपूर दक्षता घ्यावी.

(1) ज्या संस्थेचे विशेष लेखापरीक्षण करावयाचे आहे त्या संस्थेच्या अंतर्गत लेखापरीक्षणाची जबाबदारी ज्याच्यावर आहे, त्यांस्थेच्या लेखापरीक्षक/ लेखा अधिकारी यांनी त्या प्रकरणाची प्रथम, प्राथमिक चौकशी करुन, प्राथमिक चौकशी अहवाल स्थानिक निधी लेखा विभागाकडे पाठवावा आणि लेखापरीक्षणासाठी आवश्यक ती सर्व, कागदपत्रे, मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य यांना उपलब्ध करुन द्यावीत.

(2) कोर्ट प्रकरणी गुंतलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित कार्यालयांना लिहून, विशेष लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेली संबधित सर्व, कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत.

3. रक्कम अपहरण प्रकरणातील प्राथमिक अहवाल मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांना सादर करण्यापूर्वी त्यात प्रामुख्याने खालील गोष्टींचा समावेश आहे याची खातर जमा करावी.

(अ) भ्रष्टाचार कालावधी व त्यामध्ये गुंतलेली एकूण रक्कम.

(ब) गैरप्रकार घडलेल्या व्यवहारांची यादी व त्यांचे स्वरुप.

4. भांडार पडताळणी/अथवा प्रशासकीय निरीक्षणात आढळलेल्या त्रुटींसंबंधी, तसेच पदाचा कार्यभार हस्तांतरीत करताना आढळून येणाऱ्या त्रुटी/उणिवा यासंबंधी विशेष लेखापरीक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना पाठवू नये.

5. ज्या कालावधीचे विशेष लेखापरीक्षण सुचविण्यात आले आहे त्या कालावधीचे नियमित लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखा विभागाकडून झाले असल्याबद्दल खात्री करुनच, त्या संस्थेचे संबंधित कालावधीचे " विशेष लेखापरीक्षण " करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांना पाठवावा.

6. विशेष लेखापरीक्षण करावयाच्या प्रकरणाची माहिती सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रंजना सिन्हा
सचिव( लेखा व कोषागारे)

सहपत्र :- एक जोडपत्र.

## जोडपत्र

(महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक -- लेखाप-1093/ प्र.क्र.261/ 93/ लेखा परीक्षा, दिनांक19जून,1995)

मंत्रालयातील प्रशाकीय विभाग/महसूल विभागीय आयुक्त/ मुख्य-कार्यकारी अधिकारी/ जिल्हाधिकारी/ प्रमुख कार्यालयीन अधिकारी यांनी विशेष लेखापरीक्षण करण्यासाठी विनंती करता मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निध लेखा, महाराष्ट्र राज्य, यांचेकडे खालील प्रपत्रात माहिती भरुन पाठविणे आवश्यक आहे. कृपया स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम 1930 व त्या खालील अधिनियम 1931 मधील नियम 15 पहावे.

1) ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे विशेष लेखापरीक्षण करावयाचे आहे त्या संस्थेचे नाव

(अ) तालुका --

(ब) जिल्हा --

(क) महसूल विभाग --

2) संबधित संस्थेचे नियमित लेखापरीक्षण कोणत्या वित्तीय वर्षापर्यंत झाले आहे.

3) विशेष लेखापरीक्षण ज्या कालावधीचे करावयाचे आहे तो कालावधी (दिनांक -------------पासून ------------ पर्यंत)( कालावधी सलग नसेल तर प्रत्येक कालावधी स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा.)

4) संशयीत आर्थिक गैरव्यवहारांचे थोडक्यात स्वरुप व त्यात गुंतलेली अंदाजित रक्कम.

5) संशयीत आर्थिक गैरव्यवहारांची प्राथमिक चौकशी करणाऱ्यावर अधिकाऱ्याचे पदनाम (सोबत प्राथमिक चौकशी अहवाल जोडणे आवश्यक आहे.)

6) संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अंतर्गत लेखापरीक्षणास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम.

7) अंतर्गत लेखापरीक्षण कोणत्या कालावधीपर्यंत झाले आहे.

8) अंतर्गत लेखापरीक्षण झाले नसल्यास किंवा प्रलंबित असल्यास त्यांची कारणे काय आहेत?

9) ज्या आर्थिक व्यवहाराचे विशेष लेखापरीक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे, त्यासंबधीची सर्व कागदपत्रे उदा.धनादेश /स्थळप्रती, रोख नोंदवह्या, पावत्या, प्रमाणके, उपप्रमाणके, इत्यादि उपलब्ध आहेत काय? असल्यास ती कोणाच्या ताब्यात आहेत?

10) वरील कागदपत्रे/ अभिलेखे विशेष लेखापरीक्षणासाठी केव्हा व कोठे उपलब्ध करुन दिली जातील?

11) अफरातफर प्रकरणी कागदपत्र पोलीस स्टेशन मध्ये जप्त अथवा ताब्यात असलेल्या अशा अभिलेख्यांचे विशेष लेखापरीक्षण करणेबाबत विधी व न्याय विभागाची तथा ज्युडिशीअल मॅजिस्ट्रेट यांची परवानगी घेतली असल्यास त्यांचा पत्र क्र.व दिनांक नमूद करावा.

विशेष लेखापरीक्षण प्रस्तावित करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम व स्वाक्षरी.